IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 1, February 2024

# नाशिक जिल्ह्यातील वाणिज्य विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या युवकांच्या उद्योजकीय गुणांचे अध्ययन

प्रा. डॉ. उदय खंडू टेके
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग
म. स. गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प

**प्रास्ताविक**

तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध होत नसल्यामुळे व्यवसाय सुरु केला जातो, परंतु व्यवसाय यशासाठी 'व्यवसाय संधी' व 'व्यावसायिकता' हे दोन महत्त्वाचे घटक असतात.संधी असेल तर व्यवसाय सुरू करता येईल; पण व्यावसायिकता नसेल तर मात्र व्यवसायात यश मिळणार नाही,व्यवसायाचे अस्तित्व कायमस्वरूपी राहणार नाही.अनेक तरुण,ज्यांच्या कुटुंबात, अगोदर कुणीही व्यवसाय केलेला नाही, त्यांच्याकडे व्यवसायाची पार्श्वभूमी नाही, वारसाहक्काने येणारे सल्ले व माहिती नाही असे तरुण नोकरीच्या अभावी उद्योग सुरु करत आहेत/करणार आहेत त्यामुळे ते प्रथम पिढीच्या उद्योजक ठरणार आहेत.

तरुणांच्यामध्ये 'उद्योजकीय व्यावसायिकता' येण्यासाठी अंगभूत गुणांची तसेच काही गुण अंगी बानविण्याची गरज आहे. उद्योजकीय कार्याचे यश हे उद्योजकाकडे असणाऱ्या गुणांचा परिणाम असते असे म्हणणे अयोग्य ठरणार नाही.ही उद्योजकीय कौशल्ये अथवा गुणांच्या बाबतीत नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयीन तरुणांची स्थिती काय आहे हे अभ्यासले आहे. यासाठी नाशिक जिल्ह्यातील वाणिज्य विद्याशाखेत पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी अभ्यासले आहेत.

यशस्वी उद्योजक बनण्यासाठी व्यक्तीमध्ये काही ठराविक उद्योजकीय वैशिष्टे (Entrepreneural Traits) असणे अत्यावश्यक आहे.काही मानसशास्त्रीय (Psychological) आणि वागणूक विषयक (Behavirioul) चाचण्यांचा उपयोग करून कोणत्या व्यक्तीमध्ये उद्योजकीय वैशिष्टे आहेत हे ठरविता येते.अशा व्यक्तींची काळजीपूर्वक निवड करून त्यांना एका पूर्वनियोजित व व्यवस्थितपणे संघटीत करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आल्यास,व्यावसायिक पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातूनही पहिल्या पिढीचे यशस्वी उद्योजक निर्माण होऊ शकतात हे सिद्ध झाले आहे.[१]

**व्यक्तीचे गुण** म्हणजे त्या व्यक्तीचे असे वैशिष्ट्यपूर्ण घटक की जे त्याला इतर व्यक्तींपासून स्वतःची वेगळी ओळख करून देतात.व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाची अशी वैशिष्ठे जी व्यक्तीला मी कोण आहे याचे उत्तर देतात.कोणत्याही व्यक्तीकडे एकापेक्षा अनेक वैशिष्ट्यपूर्ण घटक दिसून येतात त्यामुळे व्यक्ती अनेक वैशिष्ट्यपूर्ण घटकांचा समुच्चय असतो असे म्हटले जाते.व्यक्तीचे एखाद्या क्षेत्रातील यश/निष्पत्ती हे त्यांच्या असणाऱ्या गुणांच्या वापरावर अवलंबून असते.[२] त्यामुळे उद्योजकाला औद्योगिक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आपले वैशिष्ट्यपूर्ण घटक पूर्ण क्षमतेने वापरावे लागतात त्याला उद्योजकांचे गुण म्हणता येईल.

एका यशस्वी उद्योजकाकडे कोणते गुण असतात/असावे यावर सर्व अभ्यासकांचे एकमत असणे केवळ अशक्य आहे कारण ही वैशिष्ट्ये प्रत्येक उद्योजकाच्या बाबतीत वेगवेगळी असतात तसेच काही वैशिष्ट्ये प्रत्येक उद्योजकाच्या बाबतीत समान असतात.

विद्यार्थ्यांकडे असलेल्या उद्योजकीय गुणांचे निर्धारण करण्यासाठी यशस्वी उद्योजकांच्या गुणांचा अभ्यास केल्यानंतर जे गुण दिसून येतात त्यापैकी प्रमुख दहा गुण या संशोधनात अभ्यासले आहेत.ते दहा गुण पुढीलप्रमाणे.- **१) नवनिर्मिती २) कठोर परिश्रमाची तयारी ३) सिद्धी प्रेरणा ४) धोका स्वीकारण्याची क्षमता ५) निर्णय घेण्याची क्षमता ६) नियोजन, दूरदृष्टी आणि समस्या निवारण ७) नेतृत्व आणि प्रेरणा क्षमता ८) माहिती शोधक ९) आंतर वैयक्तिक कौशल्य १०) आत्मविश्वास.**

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 1, February 2024

या संशोधनासाठी नाशिक जिल्ह्यातील वाणिज्य विद्याशाखेत द्वितीय वर्षात (M.COM) उच्च पदवीचे शिक्षण घेणाऱ्या ५०० विद्यार्थ्यांचे अध्ययन केले आहे. उद्योजकीय गुण निर्धारित करण्यासाठी प्रत्येक गुणाची काही वैशिष्टे विद्यार्थ्यांमध्ये असणे आवश्यक आहेत. विद्यार्थ्यांचे उद्योजकीय गुण जाणून घेण्यासाठी प्रत्येक गुणांतर्गत पाच विधाने तयार केली व विद्यार्थ्यांचे त्या विधानाविषयी प्रतिसाद पाच बिंदू लिकर्ट स्केल (Five Point Likert Scale) द्वारे प्राप्त केले.या स्केल मध्ये विधानास पुर्ण सहमत (Strongly Agree) ते पुर्ण असहमत (Strongly Disagree) असे प्रतिसाद जाणून घेतले आहेत.

गुणांचे निर्धारण करण्यासाठी मध्य (MEAN), प्रमाण विचलन (STANDARD DEVIATION) व विचरण गुणांक (COEFFICIENT OF VARIANCE) या संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर केला आहे.

सर्व विधानांच्या मध्यची सरासरी काढून हा (सरासरी मध्य) मध्य जर तटस्थ बिंदू पेक्षा जास्त असेल तर तो विशिष्ट गुण विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाला आहे म्हणजेच विद्यार्थी तो गुण धारण करतात व हा मध्य जर तटस्थ बिंदू पेक्षा कमी असेल तर तो विशिष्ट गुण विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाला नाही म्हणजेच विद्यार्थी तो गुण धारण करीत नाहीत असा निष्कर्ष काढला आहे.

तटस्थ बिंदू खालीलप्रमाणे निश्चित केला आहे.

पाच बिंदू लिकर्ट स्केलवर विद्यार्थ्यांचे प्रतिसाद जाणून घेतले व तटस्थ बिंदू खालीलप्रमाणे निर्धारित केला आहे. पुर्ण सहमत या प्रतिसादास ५ इतका भार (Weight) दिला आहे,त्यानुसार उतरत्या क्रमाने सहमत असेल तर ४,निश्चित सांगता येत नाही यासाठी ३ असहमत असेल तर २ व पुर्ण असहमत असेल तर १ असा भार किंवा महत्व निश्चित केले आहे.

$$\text{तटस्थ बिंदू} = \frac{५+४+३+२+१}{५} = ३$$

विद्यार्थी किती प्रमाणात हे गुण धारण करतात हे ठरविण्यासाठी विचरण गुणांकाद्वारे रँक निश्चित केल्या आहेत. दहा गुणांसाठी १ ते १० इतक्या रँक निश्चित केल्या आहेत. सर्वात कमी विचरण गुणांकासाठी १ ही रँक याप्रमाणे सर्वात जास्त विचरण गुणांकासाठी १० ही रँक दिलेली आहे. विचरण गुणांक कमी याचा अर्थ त्या गुणाचे निर्धारण करणाऱ्या विधानाच्या प्रतिसादामधील विचलन कमी. म्हणजेच ज्या गुणाचा विचरण गुणांक कमी तो गुण विद्यार्थी जास्त प्रमाणात धारण करतात. विचरण गुणांक जितका जास्त त्याप्रमाणे संबधित गुण धारणेचे प्रमाण कमी असा निष्कर्ष काढलेला आहे.

विद्यार्थ्यांच्या लिंगानुसार वर्गीकरण खालील **तक्ता क्र.१** मध्ये दिलेले आहे

**लिंगानुसार वर्गीकरण**

| लिंग | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मुले | १६५ | ३३ |
| मुली | ३३५ | ६७ |
| एकूण | ५०० | १०० |

**स्रोत**-प्रश्नावलीद्वारे प्राप्त माहिती

तक्ता क्रमांक १ नुसार मुलांची संख्या १६५ (३३%) आहे तर मुलींची संख्या ३३५ (६७%) इतकी आहे. मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे.

**तक्ता क्रमांक** २ मध्ये लिंगावर आधारित उद्योजकीय गुणांचे विश्लेषण केले आहे.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 1, February 2024

**लिंगावर आधारित उद्योजकीय गुण**

| अ.क्र. | उद्योजकीय गुण | मुले | | | मुली | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मध्य | विचरण गुणांक (%) | रँक | मध्य | विचरण गुणांक (%) | रँक |
| १ | नवनिर्मिती | ४.४३०३ | १२.७९९७ | २ | ४.३२२३ | १७.५९३१ | २ |
| २ | कठोर परिश्रमाची तयारी | ४.५०९० | १२.५१८० | १ | ४.३२८३ | १७.०४६३ | १ |
| ३ | सिद्धी प्रेरणा | ४.४१२१ | १३.८८५५ | ३ | ४.२७१६ | १९.५१५० | ४ |
| ४ | धोका स्वीकारण्याची क्षमता | ३.८८४८ | २९.०६३५ | १० | ३.८९२५ | २८.१७३२ | १० |
| ५ | निर्णय घेण्याची क्षमता | ४.१६९६ | २३.५४३९ | ८ | ४.०७१६ | २३.३६४२ | ९ |
| ६ | नियोजन, दूरदृष्टी आणि समस्या निवारण | ४.२४८४ | १९.६५४५ | ६ | ४.२०८९ | २१.२०७९ | ७ |
| ७ | नेतृत्व आणि प्रेरणा क्षमता | ४.३३९३ | १८.५७८४ | ४ | ४.२४१७ | २०.१६२० | ६ |
| ८ | माहिती शोधक | ४.१०९० | २४.६९५१ | ९ | ४.१६११ | २२.९१३९ | ८ |
| ९ | आंतर वैयक्तिक कौशल्य | ४.२१८१ | २१.९३९७ | ७ | ४.२६५६ | १९.७८६१ | ५ |
| १० | आत्मविश्वास | ४.२८४८ | १९.३७३३ | ५ | ४.२९५५ | १७.९७४२ | ३ |

**स्त्रोत**-प्रश्नावलीद्वारे प्राप्त माहिती

**निष्कर्ष**

तक्ता क्रमांक २ मध्ये लिंगावर आधारित उद्योजकीय गुणांचे विश्लेषण केले आहे त्याचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

१) ज्या दहा उद्योजकीय गुणांचा अभ्यास केला आहे त्या प्रत्येक गुणाचा मध्य तटस्थ बिंदु(३)पेक्षा जास्त असल्याने हे दहा गुण मुलांमध्ये व मुलींमध्ये विकसित झाले आहेत.

२) या दहा गुणांपैकी 'नवनिर्मिती', 'कठोर परिश्रमाची तयारी', 'सिद्धीप्रेरणा', 'नियोजन, दूरदृष्टी आणि समस्या निवारण', 'नेतृत्व आणि प्रेरणा क्षमता' या पाच गुणांचा स्तर (प्रमाण) मुलींच्या तुलनेत मुलांमध्ये जास्त आहे.

३) या दहा गुणांपैकी 'धोका स्वीकारण्याची क्षमता', 'निर्णय घेण्याची क्षमता', 'माहिती शोधक', 'आंतर वैयक्तिक कौशल्य', 'आत्मविश्वास' या पाच गुणांचा स्तर (प्रमाण) मुलांच्या तुलनेत मुलींमध्ये जास्त आहे.

४) मुलांच्या विचरण गुणांकाचा विचार करता सर्वात कमी विचरण गुणांक (१२.५१८०) 'कठोर परिश्रमाची तयारी' या गुणाचा आहे तर सर्वात जास्त विचरण गुणांक (२९.०६३५) 'धोका स्वीकारण्याची क्षमता' या गुणाचा आहे. म्हणून 'कठोर परिश्रमाची तयारी' या गुणाची रँक १ आहे, तर 'धोका स्वीकारण्याची क्षमता' या गुणाची रँक १० आहे.म्हणजेच मुलांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात असणारा गुण आहे 'कठोर परिश्रमाची तयारी'. तर सर्वात कमी प्रमाणात असणारा गुण आहे 'धोका स्विकारण्याची क्षमता'. या दरम्यान क्रमाने गुणाचे प्रमाण कमी - कमी होत जाणारे गुण आहेत

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 1, February 2024

'नवनिर्मिती', 'सिद्धी प्रेरणा', 'नेतृत्व आणि प्रेरणा क्षमता', 'आत्मविश्वास', 'नियोजन, दूरदृष्टी आणि समस्या निवारण', 'आंतर वैयक्तिक कौशल्य', 'निर्णय घेण्याची क्षमता',व 'माहिती शोधक'.

५) मुलींच्या विचरण गुणांकाचा विचार करता सर्वात कमी विचरण गुणांक (१७.०४६३) 'कठोर परिश्रमाची तयारी' या गुणाचा आहे तर सर्वात जास्त विचरण गुणांक (२८.१७३२) 'धोका स्वीकारण्याची क्षमता' या गुणाचा आहे. म्हणून 'कठोर परिश्रमाची तयारी' या गुणाची रॅंक १ आहे, तर 'धोका स्वीकारण्याची क्षमता' या गुणाची रॅंक १० आहे.म्हणजेच मुलींमध्ये सर्वात जास्त प्रमाणात असणारा गुण आहे 'कठोर परिश्रमाची तयारी'. तर सर्वात कमी प्रमाणात असणारा गुण आहे 'धोका स्विकारण्याची क्षमता'. या दरम्यान क्रमाने गुणाचे प्रमाण कमी - कमी होत जाणारे गुण आहेत 'नवनिर्मिती', 'आत्मविश्वास', 'सिद्धी प्रेरणा', 'आंतर वैयक्तिक कौशल्य', 'नेतृत्व आणि प्रेरणा क्षमता', 'नियोजन, दूरदृष्टी आणि समस्या निवारण', 'माहिती शोधक',व 'निर्णय घेण्याची क्षमता'.

**समारोप**

येणारा काळ ओळखून,विद्यार्थ्यांच्या गरजांचा अभ्यास करून त्याप्रमाणे विद्यापीठाने अभ्यासक्रमात बदल करणे गरजेचे आहे.उच्च शिक्षण घेण्यामागचा बहुतांश विद्यार्थ्यांचा हेतु नोकरी प्राप्त करणे, तसेच आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होणे हा असतो. उद्योजकता अभिमुख शिक्षण उपलब्ध करून दिले तर नोकरी मागणाऱ्यांची संख्या कमी होईल.विद्यार्थी स्वयंरोजगारामध्ये स्वतःची कारकीर्द करतील. त्यामुळे कुटुंबास पर्यायाने समाजास हे फायदेशीर ठरेल.

**संदर्भ**

[1]. डॉ.अरुण येवले, डॉ.छाया सुखदाणे,डॉ.अरविंद चौधरी - व्यावसायिक उद्योजकता- 2019 -प्रशांत पब्लिकेशन, जळगाव पान नं.८३.

[2]. K.Sasi Kumar and Mr.Jacob Thomas - Human Resource Management Practices in Kerala State Co-operative Bank Ltd.-2000,Publication-Management Researcher Page No.41